# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

---

जळगाव, दि. २ : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभाग आणि माय भारत, जळगाव यांच्या संयुक्त विद्यमाने 'नशा मुक्त युवा फॉर विकसित भारत संकल्प अभियान' अंतर्गत रविवारी (दि.२) विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दूरदृश्य प्रणालीद्वारे देशभरातील युवकांशी संवाद साधत देशाला विकसित भारत करण्यासाठी  भारत व्यसनमुक्त असणे आवश्यक आहे त्याकरीता युवकांनी पुढाकार घेण्याचे आवाहन केले.

या कार्यक्रमास प्र-कुलगुरू प्रा. एस. टी. इंगळे, अप्पर जिल्हाधिकारी श्रीमंत हारकर, महापौर दीपमाला काळे, महामंडलेश्वर जनार्दन गिरी महाराज, वारकरी संप्रदायाचे ह.भ.प. भाऊराव पाटील, इस्कॉनचे पार्थ सारथी दास, प्रजापिता ब्रह्मकुमारीच्या मीनाक्षी दीदी, अण्णा महाराज वाडीले, संत निरंकारी मिशनचे राजकुमार वाणी, कुलसचिव डॉ. विनोद पाटील, वित्त व लेखाधिकारी सीए रवींद्र पाटील,  क्रीडा संचालक डॉ. दिनेश पाटील, राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. प्रवीण महाले तसेच माय भारत युवा संघटनेचे अभिषेक चौरे यांच्यासह विद्यार्थी, स्वयंसेवक व मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी युवकांना संबोधित करताना पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले की, विकसित भारताच्या संकल्पाची पूर्तता करण्यासाठी देशातील युवा शक्ती व्यसनमुक्त असणे अत्यंत आवश्यक आहे. तन, मन आणि आत्मविश्वासाला खिळ घालणाऱ्या ड्रग्जसारख्या घातक व्यसनांपासून युवकांनी दूर राहून समाजात जनजागृती करावी. सामूहिक प्रयत्नांतून मोठी संकटेही दूर होऊ शकतात. त्यामुळे प्रत्येक युवकाने स्वतः व्यसनमुक्त राहण्याबरोबरच इतरांनाही व्यसनमुक्तीची शपथ देऊन या अभियानाचा प्रचार-प्रसार करावा, असे त्यांनी आवाहन केले.

पंतप्रधानांनी पुढे सांगितले की, आजपासून पुढील १०० रविवार देशभर 'नशा मुक्त युवा फॉर विकसित भारत संकल्प अभियान' राबविण्यात येणार आहे. २०४७ पर्यंत विकसित भारताच्या निर्मितीत युवकांची ऊर्जा, कल्पकता, विज्ञान-तंत्रज्ञानातील कौशल्य, क्रीडा आणि स्टार्टअपमधील योगदान महत्त्वाचे ठरणार आहे. मात्र व्यसनाच्या आहारी गेलेला युवक

स्वतःचे आणि कुटुंबाचे भवितव्य धोक्यात घालतो. त्यामुळे घरातील एखादा युवक व्यसनाच्या आहारी गेला असल्यास ते लपविण्याऐवजी त्याच्याशी संवाद साधून त्याला व्यसनमुक्त करण्यासाठी प्रयत्न करावेत, असेही त्यांनी सांगितले.

ही मोहीम ‘नशा मुक्त भारत’ आणि ‘विकसित भारत @२०४७’ या संकल्पनेला अनुसरून राबविण्यात येत असून, जनजागृती, समुदाय सहभाग, क्रीडा, संस्कृती, फिटनेस, माइंडफुलनेस आणि सकारात्मक सामाजिक उपक्रमांच्या माध्यमातून व्यसनमुक्त समाजनिर्मितीसाठी युवकांच्या नेतृत्वाला प्रोत्साहन दिले जाणार आहे.

कार्यक्रमादरम्यान कमलेश सोनवणे यांनी उपस्थितांना ‘नशा मुक्ती प्रतिज्ञा’ दिली. तसेच १०० आठवड्यांच्या देशव्यापी रविवारीय अभियानाचा शुभारंभ करण्यात आला.

यावेळी प्रजापिता ब्रह्मकुमारीच्या मीनाक्षी दीदी, महामंडलेश्वर जनार्दन गिरी महाराज, संत निरंकारी मिशनचे राजकुमार वाणी तसेच महापौर दीपमाला काळे यांनीही युवकांना व्यसनमुक्त जीवनाचे महत्त्व पटवून देत सामाजिक परिवर्तनासाठी पुढाकार घेण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक, सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. प्रवीण महाले यांनी केले.

---

जा.क्र.कबचौउमवि/१६/बातमी/२०२६ दि २ ऑगस्ट २०२६

प्रति

मा. संपादक,

कृपया वरील बातमी आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून प्रसिध्दीस द्यावी ही विनंती.

आपला विश्वासू

जनसपंर्क अधिकारी करीता